www.maharashtratimes.com

मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई ■ १७ जुलै २०१७ | mumbai.mtonline.in महामुंबई | महाराष्ट्र टाइम्स ५

# रिक्षा-टॅक्सींची नवी दरवाढ नको

**म. टा. खास प्रतिनिधी,** मुंबई

रिक्षा-टॅक्सीच्या दरांमध्ये नवीन वाढ करू नये, ओला-उबेरसरख्या खासगी टॅक्सीसेवांचे दरही कधी कमी, कधी चढे अशा विषम स्थितीत नसावेत, अशी सूचना मुंबई ग्राहक पंचायतीने केली आहे. राज्य सरकारने रिक्षा-टॅक्सीचे भाडेसूत्र ठरविण्यासंदर्भात नेमलेल्या बी.सी. खटुआ समितीस पाठविलेल्या पत्रात पंचायतीने ही भूमिका स्पष्ट केली आहे.

रिक्षा आणि टॅक्सीचे भाडेसूत्र ठरविण्यासंदर्भात राज्य सरकारतर्फे नेमण्यात आलेल्या खटुआ समितीने या दरांमध्ये वाढ न करण्याची भूमिका मांडली आहे. सरकारने यापूर्वी नेमलेल्या एकसदस्यीय हकीम समितीनेही, 'भाडेसूत्र ठरविण्यासाठी गृहित धरलेल्या घटकांचे दर वास्तवदर्शी नव्हते', अशी टिपणी केली आहे. रिक्षा-टॅक्सींसाठी दुरुस्ती-देखभालीचा खर्च, विमा, कर, घसारा अशासंदर्भातील सर्व दर प्रत्यक्षापेक्षा जास्त स्वरूपात होते. तीच गत इतर घटकांबाबत असल्याचा मुद्दा मांडत खटुआ समितीने रिक्षा-टॅक्सींची दरवाढ करू नये, असे आवाहन मुंबई ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी पत्राद्वारे केले आहे.

## मुंबई ग्राहक पंचायतीची सूचना



## ओला-उबेर दरांमध्ये समतोल हवा

मागणी-पुरवठा तत्वावर ओला-उबेर टॅक्सींचे दर कधी कमालपेक्षा जास्त आणि कधी किमानपेक्षाही कमी होतात. त्याविषयीही खटुआ समितीने विचार करावा, असे मत पंचायतीने मांडले आहे. ॲपबेस्ड टॅक्सीसेवांमुळे निर्माण झालेल्या दरांच्या स्पर्धेमुळे काळ्या-पिवळ्या टॅक्सीसेवांवर परिणाम होत आहे. अशावेळी काळ्या-पिवळ्या टॅक्सीचालकांनी उत्तम सेवा, दर्जा देण्यावर भर द्यावा, अशीही भूमिका पंचायतीने मांडली आहे.